REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# अफगाणिस्तान चे भूराजकीय व भूसामरिक महत्व व भारत - अफगाण ऐतिहासिक संबध

प्रा. प्रशांत सराफ[१] , प्राचार्य. डॉ. व्ही. वाय. जाधव[२]
[१]सैनिकशास्त्र विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी.
[२]पी.एस.वाडिले कला महाविद्यालय, थाळनेर ता.शिरपुर.

*अफगाणिस्तान हे भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या निर्णय प्रक्रियेत व्यूहात्मक दृष्टीकोनातुन भूसामरिक स्थानामुळे फार महत्वाचे राष्ट्र आहे. चीन, इराण, पाकिस्तान व मध्य अशियायी राष्ट्रांना जोडणारे भौगोलिक स्थान हे वैशिष्टये .प्राचीन काळापासुन भारताच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतीक जडणघडणीच्या प्रक्रियेत महत्वाची भूमिका दिसून येते.*

*प्राचीन काळी भारतातून मध्य आशियात जाणारा रेशिम मार्ग (Silk Route) अफगाणिस्तानात जात असे. रशिया व ब्रिटीशांनी अफगाणिस्तानला बफर स्टेट ची दिलेली मान्यता भौगोलिक स्थानामुळे महत्वपुर्ण ठरते. भारताची फाळणी व पाकिस्तानची निर्मिती त्यामुळे भारत-अफगाण भौगोलिक अंतर/दुरावा निर्माण झाला. तरी पण भारत अफगाण संबधांना ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या आधारे बळकटी प्राप्त होत गेली. तालिबान च्या उदयाने राजकीय सामाजिक संबधांत दुरावा निर्माण झाला. अमेरिकेवरील 9/11 च्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-अफगाण राजकीय संबंधाना पुन्हा चालना मिळालेली दिसते.*

## प्रस्तावना :-

भारत - अफगाणिस्तान चे संबंध ऐतिहासिक आहेत. प्राचीन काळात भारतीय संस्कृतीचा उल्लेख अफगाणिस्तानच्या साहित्य-इतिहासात दिसून येतो.अफगाणिस्तान मध्ये मंदिरे, बौध्द मूर्ती यांचे अवशेष हेच दर्शविण्याचा प्रयत्न करतात की एकेकाळी अफगाण मध्ये हिंदू व बौध्द राजांचे वेगवेगळया भागात राज्य होते. तसे पाहिले तर महाभारताच्या कालखंडापासून भारत-अफगाण (म्हणजे त्यावेळेचा गांधार प्रदेश) संबंधाची पार्श्वभूमी दिसून येते.

प्राचीन काळापासुन अफगाणिस्तान चे भूराजकीय स्थान भारतासाठी महत्वपुर्ण आहे. इ.स.पूर्व 326 मध्ये अलेक्झांडरचे आक्रमण अफगाणिस्तान च्या खैबर खिंडीतूनच झाले. महम्मद गझनी, मोहम्मद घौरी, बाबर, अहमदशाहा अब्दाली इ. सेनाधिकाऱ्यांनी अफगाण मधुनच शासक म्हणून भारताविरुध्द युध्द कार्यवाही केलेली दिसुन येते.

अफगाणिस्तान हे राष्ट्र अंतर्गत परिस्थितीमुळे अशांत आहे. अंतर्गत यादवी मुळे अस्थिरता दिसून येते पण द.आशियातच काय आशियाच्या महत्वाच्या भौगोलिक स्थानावर असलेला हा प्रदेश स्वतः वैशिष्टपुर्ण रचनेमुळे अनेक राष्ट्रांच्या सुरक्षेला प्रभावित करतो.

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रा राष्ट्रांचे हितसंबध निर्माण होण्यामागे भौगोलिक परिस्थिती महत्वाची असते. म्हणजेच त्या राष्ट्राच्या भौगोलिक स्थानावरून देखील संबध जोडले जातात.[1] अफगाणिस्तानचे भूसामरिक महत्व भारतासाठी ऐतिहासिक काळापासून दिसून येते.पण सध्याचे जागतिक संदर्भ बघितले तर असे लक्षात येते की एखाद्या भूराजकीय चौकटीत घडणाऱ्या घटनांचा परिणाम इतर भिन्न राष्ट्रांवर होताना दिसून येतो.म्हणूनच आफगाणिस्तान मध्ये असलेली अस्थिरता भारताच्या सुरक्षेसाठी धोकादायक आहे तशी इतर राष्ट्रांच्या हितसंबधाना धोकादायक आहे.यामुळेच अफगाणिस्तान मधील भूराजकीय व भूसमरिक स्थितीचे आकलन भौगोलिक, सामाजिक, राजकीय दृष्टीने महत्वाचे आहे.

## उद्दिष्टे -

1) भारत-अफगाण ऐतिहासिक संबंधाचा आढावा घेणे.
2) अफगाणिस्तानचे भूराजकीय महत्व जाणून घेणे.
3) भारत-अफगाणिस्तानचे भूसामरिक महत्व जाणून घेणे.
4) अफगाणिस्तानची राजकीय, सामाजिक , परिस्थिती चा आढावा घेणे.
5) भारत-अफगाण संबंधाच्या विकासात्मक वाटचालाचा थोडक्यात आढावा घेणे.



### गृहितके

- प्राचीन काळातील संदर्भ - मैत्रीपुर्ण व्यवहार भारताच्या भौगोलिक भागावर अफगाणिस्तानचा प्रभाव दिसुन येतो.
- अमेरिकेवरील 9/11 च्या हल्ल्यानंतर भारत अफगाण राजकीय संबंधाना नवीन दिशा मिळालेली दिसुन येते.
- आफगाणिस्तान मधिल राजकीय अस्थिरता भारताच्या सुरक्षेला प्रभावित करते.

### भारत-अफगाण संबंधाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

अफगाणिस्तानचा भारतासोबतच्या संबंधाचा इतिहास हा इ.स.पूर्व 400 पासूनचा आहे. प्राचीन कालीन हडप्पा नागरी संस्कृती पासुन भारत अफगाण संबंधाची परंपरा आजतागायत या दोन्ही देशांनी जोपासल्याचे दिसून येते. ऋग्वेदा मध्ये अफगाणिस्तान मधील काबूलनदी चा कुभ म्हणुन उल्लेख दिसुन येतो.

अलेक्झांडर ने भारतावर आक्रमण करण्यापुर्वी इ.स.पूर्व 329 ते 327 या काळात अफगाण प्रदेशावर राज्य केले होते. पुढे अफगाणच्या दक्षिणेकडील भागावर चंद्रगुप्त मौर्य ने सत्ता प्रस्थापित केली होती. नंतरच्या काळात कुशान घराण्याचा राजा कनिष्क याने भारतातून अफगाणिस्तान व मध्य आशियात बौध्द धर्माचा प्रसार केला. कनिष्क च्या राजवटीच्या काळात अफगाण मध्ये बौध्द धर्म अधिक प्रभावी ठरला. बामियान मधील बौध्द मूर्तीची निर्मीती ही कनिष्कच्या काळातील आहे.

सातव्या शतकाच्या सुरुवातीला अफगाणिस्तानात इस्लाम धर्माचा प्रवेश झाला. मोहम्मद गझनी, घौरी, तैमुरलंग, चेंगीझखान, बाबर यांनी अफगाणिस्तान मार्गे भारताच्या वायव्य सरहद्दीवरुन आक्रमणे केली. या आक्रमण कर्त्यांनी जसा भारताच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतीक बाबींवर प्रभाव पाडला तसाच अफगाणिस्तानच्या राजकीय, सामाजिक, संस्कृती वर प्रभाव पाडला. त्यामुळे अफगाणिस्तानात भारता प्रमाणे सांस्कृतीक, वांशिक, भाषिक, धार्मिक विविधता निर्माण झाल्याचे दिसुन येते. मध्ययुगात अफगाणिस्तानवर मोगलांचे साम्राज्य होते पण त्यांच्या पतनानंतर अफगाणची स्वातंत्र्य व भौगोलिक अखंडता निर्माण करण्यासाठी अहमदशाह अब्दाली ने प्रयत्न केले. पुढे अफगाणिस्तानची सामाजिक व भौगोलिक स्थिती ऐक्याला बाधक ठरली.[2] विविध टोळया किंवा कबीले अफगाण मध्ये निर्माण होऊ लागली 19 व्या शतकात इंग्रज व सोव्हियत युनियन या राष्ट्रांनी अफगाणवर वर्चस्व निर्माण करण्यासाठी प्रयत्न व संघर्ष केलेला दिसुन येतो त्यामागे अफगाणिस्तानचे भौगोलिक स्थान महत्वपूर्ण होते. इंग्रजाचे भारतावर वर्चस्व निर्माण झाल्यानंतर त्यांनी वायव्य सरहद्दीच्या माध्यमातुन अफगाणिस्तान कडे मोर्चा वळविला. इंग्रज व अफगाण यांच्यामध्ये तीन युध्द झाली शेवटी ब्रिटीशांनी माघार घेतली 19 ऑगस्ट 1919 ला अफगाणिस्तानला स्वतंत्र राष्ट्र म्हणुन मान्यता मिळाली.

स्वातंत्र्यपुर्व काळात अफगाणी राज्यकर्त्यांनी व नागरिकांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीला सहानभूती दर्शविली होती. भारताला स्वातंत्र्या मिळाल्यानंतर 4 जानेवारी 1950 ला भारत-अफगाण मैत्री करार होऊन राजनैतिनक संबंधाना चालना मिळाली.[3] अफगाणिस्तानच्या राजकीय अस्थिरतेने पुढे नंतरच्या काळात भारताच्या ऐतिहासिक संबंधामुळे आजही भारत अफगाण मैत्रीचा पाया मजबूत दिसुन येतो. भारतासाठी अफगाणिस्तानचे भूराजकीय व भूसामारिक महत्व प्राचीन काळापासुन दिसुन येते.

### अफगाणिस्तानची भौगोलिक स्थिती :-

नैऋत्य आशियातील भूमिवेष्टीत देश याचे क्षेत्रफळ 6,50,000 चौ.कि.मी. या देशाच्या उत्तरेस कझकिस्तान, ताझकिस्तान, उझबेकिस्तान हि मध्य आशियायी राष्ट्र आहेत. ईशान्यकडे चीन, पूर्व व दक्षिणकडे पाकिस्तान व पश्चिमेकडे इराण अशा महत्वपुर्ण राष्ट्रांच्या मध्यभागी अफगाणिस्तानचे भौगोलिक स्थान आहे.

अफगाणिस्तानची पूर्वपश्चिम लांबी सुमारे 1240 कि.मी व दक्षिणोत्तर लांबी सुमारे 560 कि.मी आहे.हा देश पर्वतमय असून समुद्रसपाटी पासूनची सर्वसाधारण उंची 1220 मीटर आहे.हिंदूकूश पर्वतरांगा, हेलमंड नदी, तसेच येथे जमीन निरनिराळ्या प्रकारची आहे. दीर्घ व कडक उन्हाळा आणि अतिशीत हिवाळा हे येथील हवामानाचे वैशिष्टे आहे. येथे खनिज संपत्ती विपूल व विविध प्रकारची आहे.परंतू भौगोलिक अलगपणा, दळणवळणाची अपूरी साधने, समुद्र किनारा नसल्यामुळे व्यापारावर मर्यादा जाणवतात.

### अफगाणिस्तान मधील सामाजिक परिस्थिती :-

अफगाणिस्तानात इस्लाम हा राष्ट्रीय धर्म आहे.बहूसंख्य लोक सुन्नी आहेत.प्राचीन काळापासून अफगाणिस्तानवर परकीय आक्रमण होत आलेली आहेत.त्यामुळे तेथे राजकीय स्थिरता त्या काळीही व आजही तितकी प्रभावशाली दिसून येत नाही. अंतर्गत यादवी संघर्षामुळे अफगाणिस्तानची परिस्थिती हलाखीची बनत गेली. आज अमेरिका, भारत, पाश्चिमात्य राष्ट्र, आर्थिक व लष्करी दृष्टीकोनातून मदत देत असली तरी अंतर्गत अस्थिरता दिसून येते त्याचा समाज जीवनावर मोठा परिणाम झालेला दिसून येतो. शैक्षणिक, आरोग्य, मुलभूत सुविधांचा अभाव त्यामुळे जास्त जाणवतो.[4] हिंदुकुश पर्वत रागांने या देशाचे उत्तर व दक्षिण असे विभाजन होते.या प्रदेशातल्या भिन्न जमाती एकमेकांत मिसळलेल्या दिसल्या तरी त्यांच्यात भिन्नत्व आढळते.हिंदू कुशाच्या दक्षिणेला पश्तून व इराणी भाषा बोलणारे वांशिक गट आढळतात.अफगाणिस्तानात भिन्न वंशाच्या जमाती आहेत.सर्वात मोठी जमात पश्तूनची आहे.ती एकूण लोकसंख्येत 40% आहे.तिची वस्ती

प्रामुख्याने दक्षिण अफगाणिस्तान आणि पाकिस्तान सिमावर्ती प्रदेशात आहे.उत्तर अफगाणिस्तानात मध्य आशियायी वांशिक गट आहेत.त्यातील मोठी जमात ताजिक आहे.तिची लोकसंख्या 30% आहे.हजारा जमात 10% आहे. अफगाणिस्तान मध्ये पठाण,ताजिक, उझबेक, हजारा या विविध वंशाच्या जमातीच्या टोळ्यांनी येथील भौगोलिक घटकावर अधिराज्य निर्माण करुन सामाजिक परिस्थीतीवर परिणाम घडवून आणलेला दिसतो.

## अफगाणमधील राजकीय परिस्थिती :-

साम्यवादी व लोकशाही राष्ट्रांतील शीतयुध्द काळात अफगाणिस्तानची तटस्थ भूमिका नंतर सोव्हियत युनियनकडे झुकलेला कल, नंतर बंडखोरांचा रशियन सैन्याला विरोध तसेच बदललेली राजकीय परिस्थिती अफगाणिस्तानचे भूराजकीय महत्व स्पष्ट करते.

1919 पर्यंत या देशात वेगवेगळ्या राजांची अनियंत्रीत सत्ता होती.1923 मध्ये अमानुल्लाखान ने मर्यादित लोकशाही व्यवस्था निर्माण केली होती. पुढे नादिरशहा, झहीर शाह, दाऊद खान, रब्बानी, तालिबान, इत्यादींनी अफगाणिस्तान वर वेळप्रसंगी राजकीय सत्ता प्रस्थापित करुन अफगाणिस्तानचे परराष्ट्र हितसंबध निश्चीत केलेले दिसून येतात. 9/11 नंतर अफगाणिस्तान मध्ये हमीद करजाई यांच्या नेतृत्वाखाली वेगवेगळया गटांनी सत्ता प्रस्थापित केली आहे.या सरकारला आंतरराष्ट्रीय राजकीय व आर्थिक पाठिंबा दिसून येतो.त्यामागचे कारण अफगाणिस्तान मधील अस्थिरता विविध देशांच्या सुरक्षेवर परिणाम करणारी आहे. आफगाणिस्तानचे नुतन राष्ट्राध्यक्ष आशरफ घनी हे राज्य कारभार बघत आहेत. प्राचीन काळापासून संघर्षाचे बिंदू असलेले अफगाणिस्तान वैशिष्ट पुर्ण भूगोलामुळे आपले भूराजकीय अस्तित्व टिकवून आहे.सोव्हियत युनियन च्या विघटनानंतर मध्य अशियायी राष्ट्रांमुळे अफगाणिस्तानचे राजकीय महत्व दिसून येते.

## अफगाणिस्तानचे भूराजकीय व भूसामारिक महत्व :-

अशिया खंडामध्ये भूराजकीय व भूसामरिक दृष्टीने अत्यंत महत्वाच्या ठिकाणी भूस्थान असल्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधावर निश्चीतच परिणाम करणारे आहे.अफगाणिस्तानच्या भूसीमा पश्चिम आशिया, दक्षिण आशिया, मध्य आशियायी राष्ट्रांशी जोडलेल्या असल्यामुळे भूराजकीय व भूसामरिक सुरक्षेच्या दृष्टीने या राष्ट्राचे महत्व दिसून येते.उत्तर दिशेला तुर्कमेनिस्तान, ताजिकीस्तान, किरगीजस्तान, उझबेकीस्तान ही मध्य आशियायी राष्ट्र आहेत.वायव्य पूर्वेला चीन तर पूर्वेकडेच्या निमूळत्या भूसीमा पाकव्याप्त काश्मीर सोबत सलंग्न आहे.दक्षिणेला पाकिस्तान तर पश्चिमेस इराण हि राष्ट्रे अफगाणिस्तानशी भूसंलग्नीत आहे. मध्य आशिया व पश्चिम आशिया कडे जाणाऱ्या भूमार्गाचे प्रवेशद्वार म्हणून अफगाणिस्तानला भूसामरिक महत्व आहे. Silk Route या नावाने देखील हा भूमार्ग ओळखला जातो.[5] दीर्घ व कडक उन्हाळा व अतिशय हिवाळा हे येथील हवामानाचे खास वैशिष्ट्य आहे.वेगवेगळया खनिज संपत्तीची उपलब्धता आहे.पण खनिज संपत्ती अविकसीत स्वरूपात आहे. अफगाणिस्तान मध्ये पठाण, ताजिक, उझबेक,हजारा या विविध वंशाच्या जमातीच्या टोळ्यांनी येथील भौगोलिक घटकावर अधिराज्य निर्माण केलेले दिसते 19 व्या शतकापासुन अंतर्गत यादवी संघर्ष निर्माण झाला असला तरी अफगाणिस्तानच्या भौगोलिक संरचनेमुळे कोणत्याही घटकाला अधिपत्य निर्माण करता आले नाही.

अफगाणिस्तानचा डोंगराळ प्रदेश हा इतिहास काळापासून व्यापारी व सैनिकी हालचालींसाठी महत्वाचा वाहतूक पट्टा राहिलेला आहे. म्हणूनच 19 व्या शतकात सोव्हियत रशिया व ब्रिटन या राष्ट्रांनी अफगाणिस्तानच्या भूसामरिक स्थानाची दखल घेतलेली दिसून येते. नंतर तर ब्रिटन ने मध्यगत राष्ट्र म्हणून अफगाणिस्तानच्या भूराजकीय महत्व दर्शविले होते. शीतयुध्दाच्या काळात पश्चिम आशियात व तेथून हिंदी महासागरा पर्यंत भूसामरिक पोच निर्माण करण्यासाठी सोव्हियत रशियाने अफगाणिस्तान सोबत मैत्री करार केला कारण या भूमार्गातून दळणवळणाचे मार्ग अतिशय महत्वाचे होते. 1979 च्या सोव्हियत रशियाच्या लष्करी हस्तक्षेपाने आंतरराष्ट्रीय भूराजकारणात अफगाणिस्तानला जागतिक महत्व प्राप्त झाले.सोव्हियत रशिया विरुध्द लढण्यासाठी अमेरिकेने पाकिस्तानच्या मध्यस्थीने मुजाहिद्दिन बंडखोर सैनिकांना शस्त्र पुरवठा केला.भारताच्या भौगोलिक दृष्टीने हि घटना अत्यंत महत्वाची होती. अफगाणिस्तानच्या भौगोलिक परिस्थितीचा आधार घेऊनच मुजाहिद सैनिकांनी सोव्हियत रशिया विरुध्द यशस्वी लढा दिला पण पाकिस्तान, मुजाहिद सैनिक, अमेरिकेचा शस्त्रपुरवठा व पाठिंबा यामुळे दक्षिण आशियात असमतोल निर्माण झाला. 1989 नंतर अफगाणिस्तानच्या भौगोलिक प्रदेशाचा उपयोग दहशतवादी केंद्रें निर्माण करण्यासाठी होऊ लागला.भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने समस्या वाढू लागल्या.तसे पाहिले तर प्राचीन काळापासून अफगाणिस्तान च्या अंतर्गत संघर्षाने भारतीय संरक्षणाच्या समस्या निर्माण केलेल्या दिसतात.परकीय आक्रमकांनी भारतावर स्वारी करण्यासाठी अफगाणिस्तान च्या खैबरखिंड या भूयुध्दनैतिक मार्गाचा वापर केलेला दिसतो.त्यामुळे दुरगामी परिणाम होऊन भारतात परकीय सत्ता निर्माण झाल्या.हा संदर्भ लक्षात घेता आजही भूराजकीय व भूसामरिक दृष्टीने अफगाणचे महत्व लक्षात येते.

शीतयुध्दानंतर व आजहि अफगाणिस्तानात अंतर्गत सुरक्षेची परिस्थिती अराजक स्वरूपाची आहे.9/11 अमेरिकेवर दहशतवादी हल्ल्यानंतर परकीय हस्तक्षेपाने सुधारणा होत असली तरी डोंगराळ प्रदेशात अजूनही तालिबानी घटक कार्यरत होत आहेत.राष्ट्र राज्याचा वचक नसल्यामुळे तेथे उप-प्रादेशिक, प्रजातीय अस्मिता आजही खंबीर आहेत.म्हणूनच भू-राजकीय अंतर्गत परिस्थितीने बिगर अराष्ट्र-राज्य घटकाची निर्मिती केलेली दिसते.त्यामुळेच दक्षिण आशियात दहशतवादी कारवाया वाढल्या. याचा मुख्य परिणाम भारतावर विशेषत : काश्मीर व नंतर

इतरत्र राज्यावर दिसून येतो. भारतासाठी मध्य आशियात प्रवेश करण्यासाठी अफगाणिस्तानचे भूराजकीय महत्व असल्याने संबंध दृढ करणे अधिक गरजेचे आहे.

### 9/11 नंतर भारत-अफगाण संबंध :-

डिसेंबर 2004 - अफगाणिस्तान मध्ये सार्वत्रिक निवडणूका अमेरिका व नाटोच्या लष्करी नियंत्रणा खाली पार पडल्या.हमीद करजाई यांच्या नेतृत्वाखाली वेगवेगळ्या गटांचे मिळून सरकार तयार झाले.लोकशाही मार्गाने निर्माण झालेल्या सरकारला भारताने सदृढ राजकीय पाठिंबा दिला व भारताला देखील अफगाणिस्तान मध्ये पुर्नप्रवेश करता आला.हमिद करझाई सरकारने सुध्दा भारता सोबत राजकीय मैत्रीचा स्विकार केला.अमेरिका व इतर मोठ्या राष्ट्रांनी देखील भारताने अफगाणिस्तानच्या पुर्नरचनेत लष्करी व राजकीय पुढाकार घ्यावा असे समर्थन केले पण भारताने राजकीय हेतूनेच प्रवेश केलेला दिसतो. अशरफ घनी सरकार सोबत भारताने चांगले राजकीय संबंध प्रस्थापित केलेले आहेत. भारत-अफगाण संबंधाचे काही ठळक वैशिष्ट्ये दिसून येतात व त्यामागील हितसंबंधपण लक्षात येतात.

1. अफगाणिस्तान मधील स्थिरता भारताच्या सुरक्षेसाठी महत्वाची आहे.
2. भारताने अफगाणिस्तानात मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक केली आहे.
3. भारताच्या पाठबळाने अफगाणिस्तानला सार्क मध्ये प्रवेश मिळाला आहे.
4. अफगाणिस्तान मध्ये मुलभूत सुविधा निर्माण करण्याचे भारताचे प्रयत्न.
5. भारताला मध्य अशियायी राष्ट्रांसोबत आर्थिक संबंध वृध्दींगत करण्यासाठी अफगाणिस्तानचे भूराजकिय व भूसामरिक महत्व आहे.
6. दोन्ही राष्ट्रांमधील भिन्न सांस्कृतिक बदल असूनही दहशतवाद विरोधी भूमिका समान दिसते.
7. 4 नोव्हेंबर 2011 ला संबंधात अधिक बळकटी प्राप्त करण्यासाठी सामरिक कराराला मान्यता.

### समारोप :-

अफगाणिस्तानातील सध्याच्या परिस्थितीची मुळे त्या देशाच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासात दडली आहेत. मध्ययुगीन परंपरा व सरंजामी वृत्तीत तिथला समाज रुजलेला आहे. अफगाणिस्तानात भारताचे अनेक हितसंबंध गुंतलेले आहेत. अगदी ऐतिहासीक कारणांपासुन ते भूराजकीय व व्यूहात्मक कारणापर्यंत याची व्याप्ती व्यापलेली आहे. अफगाणिस्तानातील स्थैर्यावरच आपले हित जोडले गेलेले आहे.

द. आशियातील आर्थिक व लष्करी शक्ती असलेला भारत हे महत्वाचे राष्ट्र आहे.आपले हितसंबध लक्षात घेऊनच अफगाणिस्तान मध्ये भारताची भूमिका महत्वाची ठरेल तरच आपल्या सुरक्षेविषयी काही प्रश्न कमी होतील.

### संदर्भ :-


1) Chopra V.D., Afghanistan and Asian stability, Gyan Publishing house, New Delhi, 1998, P-24.
2) Cohen, Bernard, Geopolitics - The Geography of International Relation, Daya Publishing house, New Delhi, 2010, P-87
3) Salman Haider,(Edt.) The Afghan war and its Geopolitical implications for India, Manohar Publication, New Delhi, 2004,P-33
4) दामले निळू, पुन्हा एकदा अवघड अफगाणिस्तान, मौजे प्रकाशन, मुंबई, 2006, पान क्रं.23.
5) लक्ष्मण शास्त्री जोशी, खंड-1मराठी विश्वकोष, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई, पान क्रं.302.
6) News Papers - The Times of India, The Hindu.